पिंपरी चिंचवड महानगरपालिका
यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय, रूग्णवाहिका विभाग
पिंपरी -18

पिंपरी चिंचवड महानगरपालिका , यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाअंतर्गत रूग्णवाहिका विभागासाठी खालिलप्रमाणे पदे एकत्रीत मानधनावर हंगामी स्वरूपात 6 महिने कालावधीसाठी भरणेबाबत .

पिंपरी चिंचवड महानगरपालिका , यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाअंतर्गत रूग्णवाहिका विभागासाठी वाहनचालक पदे दरमहा एकत्रीत मानधनावर हंगामी स्वरूपात 6 महिने कालावधीसाठी भरावयाची आहेत पदाचे नाव, पदसंख्या , शैक्षणिक अर्हता, मानधनाची रक्कम याचा तपशील खालिलप्रमाणे

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | एकत्रीत मानधन | शैक्षणिक अर्हता व पात्रता | प्रवर्गानुसार आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| 1) | वाहनचालक | 15 | 11974/- | 1) मोटार वाहन नियम 1939 नुसार जड वाहन व जीप कार चालविण्याचा परवाना आवश्यक<br>2) इयत्ता 7 वी उत्तीर्ण , मराठी व हिंदी भाषा बोलता येणे आवश्यक<br>3) जड वाहन / जीप / कार चालविण्याचा किमान 3 वर्षाचा अनुभव<br>4) स्वच्छ रेकॉर्ड व वाहन दुरूस्तीची माहिती असणे आवश्यक<br>5) शारीरिक दृष्ट्या सक्षम व संबंधित परिसरीची माहिती असणे आवश्यक | अनु.जाती – 2<br>अनु.जमाती- 1<br>वि.जा. अ – 1<br>भ.ज.क.-1<br>इ.मा.व.— 3<br>खुला -- 7 |

टिप –

1) प्रस्तुतच्या मानधनावर करावयाच्या नेमणूका ह्या पुर्णपणे तात्पुरत्या/ हंगामी स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास मनपा मधील कोणत्याही पदावर कायमस्वरूपी नेमणूकीचा हक्क सांगता येणार नाही.
2) ज्या दिवशी मनपास सदर या पदांची आवश्यकता नसेल, त्यावेळी कोणत्याही नोटीसीशिवाय मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येतील.
3) प्रात्याक्षिक / शारीरिक परीक्षेस येण्याकरिता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.

4) सर्व उमेदवारांनी प्रात्याक्षिक / शारीरिक परीक्षेसाठी उपस्थित राहताना स्वत;चा नव्याने काढलेला पासपोर्ट साईजचा फोटो , शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र , व त्या कागदपत्रांच्या मूळ प्रती व सांक्षांकित केलेल्या प्रत्यकी एकेक प्रती सोबत आणणे आवश्यक आहे.

5) निवड केलेल्या उमेदवारांना मनपा ने ठरवून दिलेल्या अटी शर्तीनुसार कामकाज करणे बंधणकारक राहिल. तसेच मनपा.च्या रूग्णवाहिका विभागामध्ये 3 शिफ्ट मध्ये कामकाज करावे लागेल.

6) वरील पदांना महाराष्ट्र आरक्षण कायदा 2004 नुसार मागासवर्गीयांचे आरक्षण लागू राहील.

7) उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना मनपा चे अधिकृत संकेत स्थळावर www.pcmcindia.gov.in उपलब्ध आहे.

8) वाहनचालक या पदासाठी प्राप्त होणा-या उमेदवारांच्या अर्जांची संख्या विचारात घेऊन उमेदवारांच्या प्रात्याक्षिक / शारीरिक परीक्षेचा निर्णय अलाहिदा घेणेत येईल.याबाबतचा संपूर्ण अधिकार मा.आयुक्त सो.यांचेकडे राहिलव तसे उमेदवारांना कळविण्यात येईल.

9) सदर पदासाठी इच्छुक उमेदवारांनी सोबत दिलेला अर्ज भरून दि.24/04/ 2017 पर्यंत मा.वैद्यकीय अधिक्षक, यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय, संत तुकाराम नगर,पिंपरी चिंचवड महानगरपालिका ,चाणक्य कार्यालय,पिंपरी येथे समक्ष अथवा पोष्टाने सादर करावा व अर्जासोबत स्वत;चा नव्याने काढलेला पासपोर्ट साईजचा 1 फोटो तसेच आवश्यक त्या कागदपत्रांच्या सांक्षांकित केलेल्या प्रती सादर कराव्यात. परीक्षेस हजर राहण्यासाठी मोबाईलवर SMS द्वारे अथवा स्वताच्या ई-मेल वर कळविण्यात येईल.मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

10) प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून प्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या प्रात्याक्षिक/ शारीरिक परीक्षेचे वेळापत्रक मनपा चे www.pcmcindia.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करणेत येईल.

11) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील दि.14/01/2010 चे शासन निर्णयानुसार पुनर्नियुक्ती न देणेबाबत कळविले आहे त्यापुळे वरील जाहीरातीमध्ये नमुद केलेल्या पदांवर मनपामध्ये यापूर्वी मानधनावर कामकाज केले असल्यास अशा उमेदवारांनी सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तथापि काही पदांकरिता नव्याने प्रथमच मानधनावर नेमणूकीसाठी अर्ज प्राप्त न झाल्यास यापूर्वी मानधनावर कामकाज केलेल्या उमेदवारांनी सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाईल. अशा उमेदवारांना पुनर्नेमणूक देणे बंधनकारक राहणार नाही.

12) सादरच्या नेमणूका करण्याचे अथवा रद्द करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त सो.यांना राहतील.याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

सही
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -18

जाहिरात क्र.
क्र. रूग्ण/1/कावि/ 1589 /2017
दि. 17/ 04/2017

सही
आरोग्य वैद्यकीय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -18

# <u>उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना</u>

**प्रति,**

**मा. आयुक्त.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी, पुणे – ४११ ०१८.

**विषय – मानधनावरील ------------------------------------------- या पदासाठी अर्ज.**

**महोदय,**

संदर्भीय जाहिरातीनुसार मी-----------------------------------------------हंगामी पध्दतीने दरमहा एकत्रित मानधनावर---------------------------------या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

आडनाव स्वत:चे नाव वडील/पतीचे नाव

1) संपूर्ण नाव :- -------------------------------------------------------------------------------------

2) पत्रव्यवहाराचा पत्ता :-------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------

---------------------------------------- मोबाईल क्र. -----------------------

3) जन्मतारीख : ------------------------------

4) लिंग : पुरुष ☐ स्त्री ☐

5) रजिस्ट्रेशन क्रमांक ------------------------------------- (

6) वाहन परवाना क्रमांक --------------------------------

7) जात - प्रवर्ग –
SC ST OBC SBC VJNT-A NT-B NT C NT-D OPEN

8) अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील –

| **अ.क्र.** | **शैक्षणिक अर्हता** | **संस्था** | **उत्तीर्ण वर्ष** | **मिळालेले गुण** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

9) तांत्रिक व इतर अर्हता तपशील –1) ----------------------------------------------------------------

2) ---------------------------------------------------------------

3)--------------------------------------------------------------

10) अनुभवाचा तपशील

| अ.क्र. | संस्थेचे नाव | संस्थेचा पत्ता दुरध्वनीसह | पद | कालावधी |
|---|---|---|---|---|

वर नमूद केलेला तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो/करते की , वर दिलेली माहिती खोटी अगर चूकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे नोकरीवरुन कमी करण्यास मी पात्र राहीन, तसेच माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**स्थळ –**

**अर्जदाराची सही**

**दिनांक –**

**सहपत्रे – अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.**

**१) शैक्षणिक व इतर अर्हतेची प्रमाणपत्र**
**२) अनुभवाचे प्रमाणपत्र**
**३) जात प्रमाणपत्र**